नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com

अकोला, कृषी हवामान सल्ला मंगळवार दिनांक – १५ डिसेंबर २०२०

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक १६ ते २० डिसेंबर २०२०)) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १६/१२ | १७/१२ | १८/१२ | १९/१२ | २०/१२ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | २८.० | २९.५ | २८.५ | २८.२ | २८.० |
| किमान तापमान (अं.से.) | १९.० | १८.० | १७.० | १४.० | १३.० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७५ | ७६ | ६८ | ६५ | ६२ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६२ | ६२ | ५८ | ५५ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | २ | २ | २ | २ | २ |
| वा-याची दिशा | ११६ | ७२ | ७१ | ७२ | ७१ |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानुसार दिनांक १६ ते २० डिसेंबर २०२० दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| कपाशी | फुल पाती/ बोंड | कपाशीची जातवार स्वच्छ वेचणी करावी व सुकलेल्या सुरक्षित ठिकाणी त्याची साठवणूक करावी. सुधारित कपाशीच्या वेचणीतील कापूस वाळवून कोरड्या जागेत साठवावा, याचे वेगळे जिनिंग करून सरकीचा उपयोग पुढील वर्षी पेरणीकरिता करता येईल.<br>कपाशी पिकाचे फरदड घेतल्यास शेंदरी बोंडअळी सोबत इतर अळ्यांना खाद्य मिळाल्यामुळे त्याचा प्रधुर्भाव जास्त राहतो व त्यांचा परिणाम पुढील हंगामातील पिकावर लवकर होता, त्यामुळे फरदड घेवू नये.<br>कापूस संकलन केंद्र व साठवणूक ठिकाणी शेंदरी बोंडअळीच्या वेवास्थापनसाठी कामगंध सापळ्याची मदत घावी व त्यामध्ये सापडलेल्या प्रौढ अवस्थेतील बोंडअळीची नियमित वेचणी करावी, त्यामुळे पुढील वर्षी त्याचा प्रादुर्भाव कमी होईल.<br>कपाशी पिकात ८-१० बोंड व नवीन फुल पाते दिसत असल्यास त्यावर कीटकनाशकची फवारणी करावी, जर ६० टक्के बोंड किडके असतील तर पिकास खर्च न करता कपाशी उपटून रब्बी साठी शेत तयार करावे. |
| तूर | वाढ | हेलीकोव्हरपा अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रती हेक्टरी या प्रमाणे उभारावेत व त्यासोबतच २० पक्षी थांबे प्रती हेक्टरी उभारावेत.<br>तूर पिकावरील शंगा पोखरणाऱ्या अळीच्या वाढीसाठी पोषक आहे व त्यामुळे तूर पिकाला शेंगा पोखरणाऱ्या आळ्यापासून नुकसान होण्याची शक्यता आहे. तरी शेतकरी बंधूनी आपल्या पिकाची पाहणी करावी व अळी ३ प्रती झाड किंवा पिसारी पतंगाची अळी १ ते ३ प्रती झाड किंवा ५ ते १० |

| | | |
|---|---|---|
| | | टक्के शेंगाचे नुकसान आढळल्यास वेवस्थापनसाठी प्रती हेक्टर २० पक्षीथांबे शेतात उभारावेत, त्यामुळे पक्षी किडीच्या अळ्या खावून फस्त करतात. तसेच नियंत्रणासाठी पहिली फवारणी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती ५० मि.ली किंवा १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती २५ मि.ली किंवा एच.ए.एन.पि.व्हि (१x१०९ पिओबी/ मि.ली) ५०० एल.ई/ हे. किंवा बॅसिलस थुरिनजिएसिस १५ मि.ली किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के ई.सी २० मि.ली किंवा थायोडीकार्ब ७५ टक्के डब्ल्यूपी २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>दुसरी फवारणी (पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी क्लोरान्ट्रोनिलीप्रोल १८.५ टक्के एस.सी. प्रवाही ३ मि.ली किंवा इन्डोक्झाकार्ब १५.८ टक्के ईसी ६.६ मि.ली किंवा लेम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही १० मि.ली किंवा फ्ल्युबेंडामाईड २० टक्के डब्ल्यूपी ५ ग्रॅम किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एसजी ४.४ ग्रॅम किंवा क्लोरान्ट्रोनिलीप्रोल ९.३ टक्के + लेम्बडासायहॅलोथ्रीन ४.६ टक्के झेडसी ४ मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी अगोदर स्तानिक वातावरण व पावसाचा अंदाज घेऊनच फवारणी करावी.<br>तूर पिकात ओलिताची सोय असल्यास व गरज पडल्यास पिकास पाणी द्यावे. |
| हरभरा | वाढ | हरभरा पिकास ओलिताची सोय असल्यास पिकास पाणी द्यावे. वेळेवर पेरणी केलेले पिक सुमारे ४५ ते ६० दिवस तणमुक्त असावे.<br>हरभरा पिकात मर रोगाचा प्रादुर्भाव दिसताच रोगट झाडे उपटून नष्ट करावीत. ट्रायकोडर्मा शेणखतात मिसळून द्यावा. बागायती हरभरा पिकावरील ओली मुळकुज व कॉलररॉट दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी योग्य ते उपाय करावा.<br>घाटेअळीच्या सर्वेक्षण व नियंत्रणसाठी ५ कामगंध सापळे प्रती हेक्टरी या प्रमाणे उभारावेत व त्यासोबतच २० पक्षी थांबे प्रती हेक्टरी उभारावेत.<br>हरभरा पिकात ५० टक्के फुलोरावर असतांना जर घाटे अळीने आर्थिक नुकसानाची पतळी (१-२ अळ्या प्रती ओळ किंवा ५ टक्के किडग्रस्त घाटे) पार केल्यास नियंत्रणासाठी पहिली फवारणी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन ५० मि.ली किंवा १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन २५ मि.ली किंवा एच.ए.एन.पि.व्हि (१x१०९ पिओबी/ प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी) ५०० एल.ई/ हे. किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के ई.सी २० मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच दुसरी फवारणी (पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी) इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एसजी ३ ग्रॅम किंवा ईथिऑन ५० टक्के ईसी २५ मि.ली. किंवा फ्ल्युबेंडामाईड २० टक्के डब्ल्युजी ५ मि.ली किंवा क्लोरान्ट्रोनिलीप्रोल १८.५ एस.सी. २.५ मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी अगोदर स्तानिक वातावरण व पावसाचा अंदाज घेऊनच फवारणी करावी. |
| गहू | पेरणी | गहु पिकास नत्राचा दुसरा हप्ता दिला नसल्यास हेक्टरी ५० किलो नत्र या प्रमाणे देण्यात यावा.<br>ओलिताखालील अति उशिरा गहुची पेरणी १५ डिसेंबर ते ७ जानेवारी पर्यंत करावी, पेरणीसाठी वाण पीडीकेवी सरदार (एकेएडब्लू ४२१०-६), एकेडब्लू-४६२७ ची निवड करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास कार्बेन्डाझीम २.५ ग्रॅम प्रती किलोची बीज प्रक्रिया करावी.<br>मावा किडीच्या नियंत्रणासाठी एकरी ५ ते १० पिवळे चिकट सापळे लावावेत. पिकावरील माव्याचे नियंत्रणासाठी २५ डब्ल्यु जी थायोमेथॉक्झान ५० ग्रॅम किंवा डायमेथोएट ३० ईसी १० मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>ओलिताचे पाणी मर्यादित असल्यास बागायती गव्हास उगवणी पासून २१, ४२ व ६५ दिवसांनी पाण्याच्या पाळ्या द्याव्यत. |

| | | |
|---|---|---|
| करडी | वाढ | करडई पिकाच्या अधिक उत्पन्नसाठी पिकास सौरक्षित ओलीत देण्याची शिफारस आहे, एक ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ५० दिवसांनी, दोन ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ३० व ५० दिवसांनी तसेच तीन ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ३०, ५० व ६५ दिवसांनी ओलीत द्यावे.<br>करडई पिकास मावा किडीचा प्रादुर्भाव (३० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे) दिसताच डायमीथोएट ३० टक्के प्रवाही १३ मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| फळझाडे | वाढ | करडई पिकाच्या अधिक उत्पन्नसाठी पिकास सौरक्षित ओलीत देण्याची शिफारस आहे, एक ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ५० दिवसांनी, दोन ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ३० व ५० दिवसांनी तसेच तीन ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ३०, ५० व ६५ दिवसांनी ओलीत द्यावे.<br>करडई पिकास मावा किडीचा प्रादुर्भाव (३० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे) दिसताच डायमीथोएट ३० टक्के प्रवाही १३ मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भाजीपाला | वाढ | भाजीपाला पिकास त्याच्या गरजे प्रमाणे पाणी द्यावे. रोपवाटिकेत उन्हाळी मिरची, वांगी व टोमाटोचे बियाणे गादीवाफ्यावर पेरावे.<br>गादीवाफ्यावर कांदा बियाणे (हेक्टरी ८ ते १० किलो) पेरावे. पांढऱ्या जाती: अकोला सफेद, फुले सफेद, यशोदा, भीमा श्वेता, पुसा व्हाईट राउंड, लाल-पुसा रेड, एन  २-४-१, निफाड- ५३, बसवंत ७८०.<br>कोथिंबीर (संभार, लसून, मुला, मेथी, पालक, श्रावण घेवडा, बटाटा, गाजर, गवार, वाटणा इ. भाजीपाला पिकांची लागवड करावी. |
| पशु / जनावरे | - | जनावरांना पायखुरी व तोंडखुरी रोगाची प्रतिबंधक लस पशु दवाखान्यात नेऊन टोचावी. जनावरांना स्वच्छ पाणी पाजावे व त्यांच्यासाठी चारा पिकांची लागवड करावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.